Q 3431

# सत्र २०२०–२१

## कोरोना जनजागृती व मास्कचे वितरण

## (Covid 19 Awareness & Mask Distribution Programme)

कोरोना कालावधीत भगवंतराव कला व विज्ञान महाविद्यालय, एटापल्ली येथील रासेयो विभागाव्दारे एटापल्ली तालूक्यातील जवळपासच्या ४ गावांमध्ये रासेयोचे स्वयंसेवक तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद यांनी प्राचार्य डॉ एस.एन.बुटे यांच्या मार्गदर्शनाखाली कोरोना जनजागृती कार्यक्रम राबविला. देशात सगळीकडे कोरोना महामारीने थैमान घातले असता महाविद्यालयातील प्राध्यापक तसेच विद्यार्थ्यांनी कृष्णार,मरपल्ली, पंदेवाही व जिवनगट्टा या गावांत जावून गावक–यांना मास्कचे तसेच सॅनिटायझरचे वाटप केले. या कार्यात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी स्वत: ५०० कापडी मास्क तयार करून त्यांचे वितरण केले. सोबतच कोरोना कालावधीत आपल्या आरोग्याची कशी काळजी घ्यावयाची याचे मार्गदर्शन केले. विशेषत: गरोदर आणि स्तनदा मातांनी यावेळी कशी काळजी घ्यावी याबाबत मार्गदर्शन केले. या कार्यात प्राचार्य डॉ. एस. एन. बुटे यांच्या मार्गदर्शनाखाली २५ विद्यार्थी तसेच रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. संदीप मैंद, प्रा. डॉ दरेकर, प्रा. डॉ पाटील, प्रा. ढबाले, प्रा. पुंगाटी यांनी मोलाचे सहकार्य केले.

तसेच कोविडमुक्त भारत या विषयावर आधारीत राष्ट्रीय स्तरावरील को फेडरेशन ऑफ युनेस्को आणि असोसिएशन ऑफ इंडीया न्यु दिल्ली यांच्या वतीने ऑनलाईन चित्रकला स्पर्धेत रासेयो स्वयंसेवक रोहीत मडावी याने प्रथम क्रमांक पटकावला.









Principal













कार्यक्रम अ...
राष्ट्रीय सेवा ...
भगवंतराव कला व वि...
एटापल्ली जि. ग...

Principal
Bhagwantrao Arts & Science
College,Etapalli Dist.Gadchiroli

SEAL
Bhagwantrao Arts & Science ... Etapalli ...